**Number of books and chapters in edited volumes/books published and papers published in national/ international conference proceedings per teacher during last five years**

# 2021-22

| Sr. No. | Name of the teacher | Title of the book / chapters published | Title of the paper | | Year of publication | ISBN number of the proceeding | Affiliating Institute at the time of publication | Name of the publisher |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. Mane H.S. | Karmgatha (Book) | Nill | Nill | 2021-22 | 978-195-730-238-6 | Arts and Commerce College, Mayani | Walnut Publication, Bhuvaneshwar |
| 2 | Dr. Mirajkar S.B. | Bhartiya Bhaktipravah : Swarup, Sahitya Ani Sanshodhan | Bhaktiparampara V Samajik Bhan | भक्तीपरंपरा व सामाजिक भान | 2021-22 | 978-81-945057-0-9 | Arts and Commerce College, Mayani | Chinmay Prakashan |
| 3 | Dr. Mirajkar S.B. | SIM University of Mumbai | Adhunik Marathi Kadambari | आधुनिक मराठी कादंबरी | 2021-22 | 978-93-91435-80-7 | Arts and Commerce College, Mayani | Mumbai University |
| 4 | Dr. Mirajkar S.B. | Applied Criticism | Upyojit Samiksha | Upyojit Samiksha | 2021-22 | 978-93-91735-63-0 | Arts and Commerce College, Mayani | Mumbai University |
| 5 | Dr. Mokashi S.A. | Maharashtratil Bhaktisampradaya | Anand Sampradaya Ani Mandesh Parampara | आनंद संप्रदाय आणि माणदेश परंपरा | 2021-22 | 978-93-94622-47-0 | Arts and Commerce College, Mayani | Samiksha Publication, Pandharpur |

# कर्मगाथा

## मातृहृदयी शिक्षकाची जीवनगाथा



डॉ. हेमांगिनी माने

'कर्मगाथा' मातृह्रदयी शिक्षकाची जीवनगाथा
लेखिका । डॉ. हेमांगिनी माने (यादव)

प्रकाशक । वॉलनट प्रकाशन, भुवणेश्वर

© सर्व हक्क सुरक्षित
डॉ. हेमांगिनी माने (यादव)
भगवंत कॉम्प्लेक्स खानापूर रोड विटा ता.खानापूर
जि. सांगली - ४१५३११
9529882700 / 9423809469
hemanginimane002@gmail.com

मुद्रक । रेवती क्रिएशन, विटा. ९६०४०९८३२३
मुखपृष्ठ आणि मांडणी । अमोल हत्तरगीकर
अक्षरजुळणी । विक्रम शितोळे व सुरज जाधव
आवृत्ती । २५ जून २०२२
ISBN - 978-195730238-6
मूल्य । २००/-

# अनुक्रम


**एक : जन्म हाच दैवयोग, बालपण, शिक्षण व विवाह**

- जन्म, बालपण व वडिलांचा अकाली मृत्यु — १९
- भगवद्गीतेचे पठण, चिंतन व विरक्तीची भावना — २४
- महाविद्यालयीन शिक्षण व कर्मवीर अण्णांच्या विचारांचा प्रभाव — २६
- माझी आई : कलावती — ३०

**दोन : उच्च कोटी मानसिकतेचे मातृहृदयी पिता**

- आमचे बालपण — ३३
- स्वकृतीतुन सुसंस्कार — ४२
- अपघाताचा आघात — ५०
- मुलींच्या उच्च शिक्षणासाठी कर्जाचा बोजा व जमिनीचाही त्याग — ५३
- वैचारिक प्रगल्भता व काळानुसार बदल — ५८
- तत्वनिष्ठा — ६१
- प्रामाणिकपणाचे फळ-कष्टाचे पैसे परत मिळाले — ६८
- डॉ.अजितचा समझोता व योगायोग — ७२

**तीन : संवेदनशील व ध्येयवादी शिक्षक**

- रयत मधील सेवा, राजीरामा व कर्तव्यनिष्ठा — ७५
- सरुताईची अनुभूती — ७९
- विखळे शाळेतील हृद्य आठवणी — ८१
- व्यासंग व संशोधन वृत्ती — ९२
- सेवानिवृत्तीचा दिवस : एक अविस्मरणीय क्षण — ९७

**चार : जनमानसातले संत**

- भगवद्गीता व गाथा हाच मुलाधार — १०१
- वैचारिक प्रगल्भता — १०४
- मान-अपमानाचे प्रसंग — ११५
- दुष्काळातही भूतदया, करुणा — ११८
- अध्यात्मिक अनुभूती व सहृदयता — १२०
- आर्थिक फसवणूक — १२५
- माणूसकीचा झरा — १२८
- परदेशी पाहुण्यांचा पाहुणचार — १३१
- एक निराशाजनक आघात — १३३

**पाच : उच्च ध्येयाची फलश्रुती**

- मुलामुलींच्या ध्येयसिद्धीचे समाधान — १३५
- अथर्व मल्टीस्पेशालिटी : स्वप्नपूर्ती — १३८

**सहा : संघर्षाची परिणती**

- वृध्दापकाळातील आजारपण-रुबी हॉलमधील संघर्ष — १४३
- अथर्वमधील दिवस — १४६
- हर्णेश्वर कॉलनीतील बंगल्यात जीवनरथ संथ गतीने सुरु — १४८
- अनंतात विरली काया। रिती झाली आभाळमाया।। — १५२

**शुभेच्छा** — १५६

# एक

## जन्म हाच दैवयोग, बालपण, शिक्षण व विवाह

# जन्म, बालपण व वडिलांचा अकाली मृत्यु

**एकादशीबाई तुजा लागला मला छंद**
**सावळा इठ्ठल माजा केशरी लेतो गंध।।**
**विठ्ठल बोलतो जनी माझी सुगरण**
**निरशा दुधाला सारखेचं विरजण।।**

अस गीत गात माझी आजी पुतळाबाई, माझ्या वडिलांची आई पंढरपूरला पायी चालत जायची तसेच दर रविवारी न चुकता मायणीला यशवंत बाबांच्या दर्शनाला जायची. माहुली (जिल्हा-सांगली) पासून अवघ्या चार कि.मी. अंतरावर मायणी ही पावन भूमि आहे. आजीचं गाव धोंडेवाडी, ते मायणीपासून सहा कि.मी. वर आहे. मायणी व माहुली ही दोन्ही जिल्ह्यांच्या सातारा व सांगली, दक्षिण व उत्तरेची गावे.

मायणी पंचक्रोशीतील अनेकांना यशवंतबाबा व सरुताईंच्या आशिर्वादाची अनुभूती आहे. त्याकाळात यशवंतबाबा भिक्षा मागायला

दारोदारी जायचे. एक दिवस माहुली गावातील माझ्या आजोबांच्या किराणा मालाच्या दुकानात यशवंतबाबा आले. आजोबा थोडे नास्तिक स्वभावाचे, त्या काळात म्हणजे तो ब्रिटीश काळ, विसाव्या शतकातील सुरुवातीचा कालावधी. आजोबा इयत्ता सातवीपर्यंत शिकलेले. मोडीतील अत्यंत सुंदर हस्ताक्षरात ठेवलेल्या नोंदी मी स्वतः पाहिलेल्या मला आठवतात. यशवंतबाबा दुकानात आले, तेलाच्या मापात बोटे बूडवून त्यांनी ती डोक्याला लावली, 'भिक्षा वाढा' असे म्हणताच आजोबा म्हणाले, 'तुला साधूलां कशाला हवी भिक्षा? तुला एक जोडा देऊ का?' असे म्हणताच यशवंतबाबा म्हणाले, 'तू मला जोडा दिलास तरी मी तुला पेढा देणार हाय!'

हा प्रसंग आजी अनेकदा माझ्या आईला सांगायची. त्याकाळात आजी-आजोबा मध्यम वय उलटूनही पुढे गेलेले. आजीची अनेक मुल लहानपणीचं गेलेली. राहिल्या होत्या फक्त तीन मुलीचं. मुलगा असावा अस आजीलां मनोमन वाटायचं. तिला मुल होणं हे वैज्ञानिक संकल्पनेपलीकडे होतं, परंतु ते घडले. माझ्या वडिलांचा काही कालावधीनंतर म्हणजे सन १९३७ साली जन्म झाला. आजीला हा दैवी चमत्कार वाटायचा.

आजोबा शेतीच्या निमित्ताने मळ्यात जायचे, त्यांचा स्वभाव प्रयोगशील होता. द्राक्षबागेचे उत्पादन करण्याचे शास्त्र आजोबांनी प्रथम या परिसरात आणले असं गावातील वयस्कर लोक सांगतात. आजोबांना गावातील लोक 'अण्णा' म्हणायचे ते नास्तिक असले तरी, माणसांसाठी त्यांचे अंतःकरण हलायचे, गावातील गोरगरिब माणसांना सढळ हाताने ते मदत करायचे. घरचे गुन्हाळघर, मोठी हवेली, जमिनीतून येणारे उत्पन्न इ. मुळे त्यांची आर्थिक स्थिती उत्तम होती.

आजी एक प्रसंग सांगायची, एक दिवस मळ्यातील रानात गावातील दलित समाजातील चार माणसं आली व शक्य तेवढी ज्वारीची कणसं भराभर खोडून घेतली व ओझे पाठीवर घेऊन चालली. ते कुणीतरी आजोबांना सांगताच 'त्यांना बोलवा गोठ्यांकडं' असं आजोबांनी सांगितले. ती बिचारी माणसं भितभित अंगणात आली. कणसांची पोती पाठीवरुन खाली उतरताच अण्णा म्हणाले, 'घरात जावा आन पाठीवरनं जाईल तेवढं बळतातलं



लेखक परिचय ।

प्रा. डॉ. हेमांगिनी सुखदेव माने

कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी

असि. प्रोफेसर, इंग्लिश विभाग

संशोधन ।

Major Crises In The Novels Of J.G. Farrell

UJC प्रोजेक्ट ।

A Socio-Psychological Crsis Of Child Labour In Indian English Novel

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्स मध्ये अनेक लेख प्रकाशित

मराठी काव्यसंग्रह ।

'शोध अस्तित्वाचा'

सदस्य ।

कला अकॅडमी, विटा

# भारतीय भक्तिप्रवाह :

## स्वरूप, साहित्य आणि संशोधन



संपादक :
डॉ. मधुकर क्षीरसागर
डॉ. शिवाजीराव देशमुख
डॉ. कैलास इंगळे

# अनुबंधचतुष्टय

◆ संपादकीय आठ

◆ **एक : कालानुबंध आणि संप्रदाय**

१. **भक्ती द्रविड उपजी**
डॉ. प्रभाकर मांडे, अहमदनगर २३

२. **संप्रदायाच्या अभ्यासाच्या दिशा**
डॉ. म. रा. जोशी, नागपूर २८

३. **वारकरी संप्रदाय : महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित**
कै.डॉ. वा. पु. गिंडे, बेळगाव ३६

४. **मध्ययुगीन मराठी संतकाव्याचा केशरमेळा** ४६
डॉ. उषा मा. देशमुख, मुंबई

५. **भक्तिकालीन संत-महंतांचे भाषाभान आणि भाषा उपयोजन**
डॉ. लीला गोविलकर, अहमदनगर ६३

६. **भक्तिपरंपरा आणि सामाजिक भान**
डॉ. श्यामसुंदर मिरजकर, मायणी ८३

७. **बौद्ध परंपरा आणि संत साहित्य**
प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे, अंबाजोगाई ८९

८. **जैन धर्म व भक्ती**
प्रा. गो.प. भालेराव, सेनगाव ९६

९. **वीरशैव धर्म संप्रदाय**
डॉ. श्यामा घोणसे, पुणे १०३

१०. **स्वामी नारायण संप्रदाय**
डॉ. संजयकुमार करंदीकर, बडोदा (गुजरात) ११५

११. **निंबरगी संप्रदायाचा भक्तिप्रवाह**
कै. डॉ. नरेंद्र कुंटे, सोलापूर १२२

१२. **महानुभाव साहित्य संशोधनाचा पुनर्विचार : काही अभ्यास**
डॉ. अविनाश आवलगावकर, पुणे १४३

६

# भक्तिपरंपरा आणि सामाजिक भान

**-डॉ. श्यामसुंदर मिरजकर**

**संस्कृती** ही सतत उत्क्रांत होत जाणारी मानवी जीवनाची विशिष्ट अवस्था असते. ती स्थळ-काळ-प्रदेशनिष्ठ असते. बाह्य पर्यावरणाचा आधार घेऊन माणूस एक भौतिक विश्व तयार करतो. हे संस्कृतीचे दृश्य अंग होय. त्यामध्ये घर-वाडा-सभागृह-मंदिरे अशा विविध वस्तू, नगररचना, कृषी, कपडेलत्ते, अलंकार, दैनंदिन गरजेच्या वस्तू, उपकरणे, अवजारे, खाद्यपदार्थ अशा अनेक वस्तूंचा समावेश होतो. परंपरा आणि उपयोगितेच्या निकषांवर हे जपले, जोपासले जातात.

संस्कृतीचा दुसरा भाग हा मनोविशिष्ट, ज्ञानात्मक व संस्कारावर बेतलेला असतो. धर्म, विविध परंपरा, लोकसंकेत, लोकाचार, यातुक्रियात्मक विधी, साहित्यादी कला, वर्तनसंकेत यांनी हा दुसरा भाग बनलेला असतो. भक्ती आणि तद्‌जन्य साहित्य यांचा समावेश संस्कृतीच्या या दुसऱ्या अंगात होतो. त्याद्वारे समाजाची विशिष्ट धारणा होते. इथे भक्तीचा धर्माशी आणि समाजधारणेशी कसा संबंध असतो ते शोधावे लागेल. मग संस्कृतीच्या जडणघडणीतील भक्तिपरंपरेचे आणि भक्तिसाहित्याचे योगदान स्पष्ट होईल.

**भक्ती : वैयक्तिक अनुभूती की सामूहिक उपासना?**

भक्तीची अनुभूती नेहमी 'मी' पासून सुरू होते. हा 'मी' धर्म, अध्यात्म, ईश्वर संकल्पना अशा मनोमय सृष्टीत विविध क्रिया व विचारधारणांनी गुंततो. मग भक्ती सुरू होते. भक्ताचे मुमुक्षू आणि निरपेक्ष असे दोन प्रकार संभवतात. मुमुक्षू साधक

(3)

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. रवींद्र कुलकर्णी**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
कला व मानव्य शाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल), मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **डॉ. सीमा मुसळे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल), मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **प्रा. डॉ. गजानन अपिने**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे.

: **प्रा. डॉ. मांतेश हिरेमठ**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
देशभक्त आनंदराव बाळवंतराव नाईक आर्ट्स अँड सायन्स कॉलेज,
चिखली, ता. शिराळा जि. कोल्हापूर.

: **डॉ. सीमा मुसळे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल), मुंबई विद्यापीठ, मुंबई.

: **प्रा. डॉ. ओमकार पोटे**
अधिव्याख्याता, मराठी विभाग,
प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वेश्वी, ता. आलिबाग, जि. रायगड.

: **प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर**
मराठी विभाग, कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी
ता. खटाव, जि. सातारा.

**जून २०२२, प्रथम मुद्रण, ISBN: 978-93-91735-80-7**

**प्रकाशक**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई.

21-22

# अनुक्रमणिका



| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **घटक १** | आधुनिक, आधुनिकता आणि आधुनिकतावाद : संकल्पनाविचार- **डॉ. गजानन अपीने** | १ |
| **घटक २** | **२अ.१ -** आधुनिक मराठी कथा - ऐतिहासिक आढावा- **डॉ. मांतेश हिरेमठ** | ४४ |
| | **२अ.२ -** १९४५ नंतरची आधुनिक मराठी कथा : ऐतिहासिक आढावा- **डॉ. सीमा मुसळे** | ६० |
| | **२आ** - आधुनिक मराठी कादंबरी- ऐतिहासिक आढावा- **डॉ. गजानन अपीने** | ७३ |
| **घटक ३** | **3अ** - आधुनिकतावादी मराठी कथा : "मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट"- (सतीश तांबे) **डॉ. ओमकार पोटे** | १०७ |
| | **३ब** - "मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट" मधील कथांचा रूपबंध – **डॉ. सीमा मुसळे** | १२४ |
| **घटक ४** | आधुनिक मराठी कादंबरी : 'पुरोगामी'- (राकेश वानखेडे) – **डॉ. श्यामसुंदर मिरजकर** | १३८ |



*****

# ४

# आधुनिक मराठी कादंबरी- 'पुरोगामी'- राकेश वानखेडे

**घटक रचना**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ आधुनिक मराठी कादंबरी

४.३ दलित साहित्य आणि दलित कादंबरी

४.४ लेखक परिचय

४.५ 'पुरोगामी' कादंबरीची आशयसूत्रे

४.६ 'पुरोगामी' कादंबरीचे कथानक

४.७ 'पुरोगामी' कादंबरीचा रूपबंध

४.८ 'पुरोगामी' कादंबरीची आधुनिकता

४.९ समारोप

४.१० संदर्भग्रंथ सूची

४.११ पूरक वाचन

४.१२ नमुना प्रश्न


## ४.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो, आधुनिक कालखंडातील मराठीतील 'पुरोगामी' ही कादंबरी आपल्याला अभ्यासासाठी नेमलेली आहे. या घटकाच्या अभ्यासातून आपल्याला खालील उद्दिष्टे साध्य होऊ शकतील.

१. आधुनिक मराठी कादंबरीच्या स्वरूपाचे स्थूल आकलन होईल.

२. आधुनिक मराठी कादंबरीची वैशिष्ट्ये समजतील.

३. मराठी दलित साहित्य व दलित कादंबरी यांचा परिचय होईल.

४. राकेश वानखेडे या आधुनिक कादंबरीकाराच्या लेखनाचा परिचय होईल.

५. 'पुरोगामी' कादंबरीची आशयसूत्रे समजतील.

६. 'पुरोगामी' कादंबरीचा रूपबंध लक्षात येईल.

७. 'पुरोगामी' कादंबरीच्या अभ्यासाने आधुनिक मराठी कादंबरीचे स्वरूप, रचनाबंध, गुणविशेष यांचा स्थूल परिचय होईल.

लक्ष्मणशास्त्री हळबे व नारो सदाशिव रिसबूड (काल्पनिक व रंजनप्रधान) ३. 'मोचनगड' प्रवृत्ती-रा. भी. गुंजीकर (ऐतिहासिक) अशी केलेली आढळते. यातील 'यमुनापर्यटन' प्रवृत्तीचे लेखन हे आधुनिक म्हणता येईल, असे आहे. कारण यामधून आधुनिक काळाच्या समस्या व वास्तव जीवनदर्शन घडविण्यात आले आहे. तर 'मुक्तामाला' किंवा 'मोचनगड' प्रवृत्तीच्या कादंबऱ्या या काल्पनिक, मनोरंजनपर व ऐतिहासिक स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे कादंबरीचा आधुनिक रचनाबंध स्वीकारलेली व आधुनिक जीवनमूल्यांचा उद्घोष करणारी तीच खऱ्या अर्थाने आधुनिक मराठी कादंबरी म्हणावी लागेल.

## ४.२ आधुनिक मराठी कादंबरी

का. बा. मराठे यांनी 'नावल व नाटक ह्यांविषयी निबंध' (१८७२) या लेखात कादंबरीला 'नवलपूर्ण घटनांचा संग्रह' म्हटले होते. हे वर्णन तत्कालीन कादंबऱ्यांना नजरेसमोर ठेवून केलेले होते. बाबा पद्मनजी यांची 'यमुनापर्यटन' (१८५७) ही मराठीतील पहिली कादंबरी वास्तववादी व बालविधवांचे दुःख मांडणारी समस्याप्रधान कादंबरी आहे. या परंपरेत पुढे कृष्णराव भालेकर – 'बळीबा पाटील' (१८७७), रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी – 'पिराजी पाटील' (१९०२), हरिभाऊ आपटे – 'पण लक्षात कोण घेतो?' १८९०), श्रीधर व्यंकटेश केतकर – 'ब्राह्मणकन्या' (१९३०) यांनी भर घातली. ती पुढे विश्राम बेडेकर, भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, अरुण साधू, रंगनाथ पठारे, राजन गवस, कमल गोखले, गौरी देशपांडे, कृष्णात खोत, आनंद विंगकर अशी विस्तारत गेली. या परंपरेत मराठीतील अनेक कादंबरीकारांचा समावेश होतो. मानवी जीवनाच्या विविध वृत्तीप्रवृत्तींचे वास्तव दर्शन घडविणे, हे या कादंबऱ्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

याबरोबरच मराठीत मनोरंजनपर काल्पनिक कादंबऱ्या लेखनाचा एक प्रवाह सुरू झाला. 'मुक्तामाला' (१८६१), 'मंजुघोषा' (१८६८) पासून सुरू झालेला हा प्रवाह ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, सुहास शिरवळकर, अनंत तिबिले, ज्योत्स्ना देवधर, बाबा कदम अशा अनेक लेखकांना कवेत घेऊन पुढे जातो. तर ऐतिहासिक-पौराणिक कादंबऱ्यांचा एक प्रवाह 'मोचनगड' (१८७१) पासून सुरु होतो, तो पुढे रणजीत देसाई, शिवाजी सावंत, ना. सं. इनामदार, नाथमाधव, गो. नि. दांडेकर, वि. वा. हडप, वि. स. खांडेकर यांच्या लेखनाने समृद्ध होतो. तसेच तो वाचकप्रिय झालेला दिसतो. पुढे प्रेरणा आणि प्रवृत्तीच्या निकषांवर अभ्यासाच्या सोयीसाठी ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, प्रादेशिक, राजकीय, चरित्रात्मक, संज्ञाप्रवाही, मनोवैज्ञानिक, प्रायोगिक असे कादंबऱ्यांचे अनेक प्रकार कल्पिले गेले. आशय, विषय, अभिव्यक्ती, रचनातंत्र अशा अनेक पातळ्यांवर कादंबरी बदलत गेली. काळाचा व अनुभवविश्वाचा विस्तीर्ण पट कवेत घेणारी ही आधुनिक मराठी कादंबरी आहे.

**कादंबरी या वाङ्मय प्रकाराविषयी समीक्षकांची खालील मते आपण लक्षात घेऊ:**

१. "पार्थिव संसाराविषयी आस्था ही कादंबरीची वृत्ती. जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्त्वदर्शित्वाचा किंवा अद्भुताचा मार्ग धरून मूलतः मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन, जीवनविषयक अनुभव वा कल्पना या कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री. ही वृत्ती, हा दृष्टिकोन, हा अनुभव वा कल्पना जिवंत

# नमुना प्रश्नपत्रिका

## तृतीय वर्ष बी. ए. सत्र-V,

## अभ्यासपत्रिका क्र. 8- आधुनिक मराठी साहित्य

**सत्रांत परीक्षा १०० गुण**

**सूचना:**

१. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

३. प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात

**प्रश्न १** **अ-** आधुनिकतावादी साहित्याच्या स्वरूपविशेषांची चर्चा करा. **(२०)**

**किंवा**

**आ-** भारत आणि महाराष्ट्रातील आधुनिकतेचा परिप्रेक्ष तुमच्या शब्दात नोंदवा.

**प्रश्न २** **अ-** आधुनिक मराठी कथेचा आढावा ठळक टप्प्यांच्या आधारे घ्या. **(२०)**

**किंवा**

**आ-** आधुनिक मराठी कादंबरीच्या बदलातील टप्पे नमूद करून त्याचे विशेष नोंदवा.

**प्रश्न ३** **अ-** 'मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट' या संग्रहातील कथांमधून दिसणारी आधुनिक मूल्ये स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

**आ-** 'मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट' या संग्रहातील 'यत्र-तत्र-सर्वत्र' या कथेचा आशय व रूपबद्ध स्पष्ट करा.

**प्रश्न ४** **अ-** 'पुरोगामी' कादंबरीचे मुख्य आशयसूत्र कोणते, ते संदर्भासह स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

**आ-** 'पुरोगामी' या कादंबरीतील विविध व्यक्तिरेखा कादंबरीच्या आशयाला कसे पुढे नेतात ते स्पष्ट करा.

**प्रश्न ५** **टिपा लिहा (कोणत्याही दोन)** **(२०)**

**अ.** प्रबोधन चळवळ

**ब.** ह. ना. आपटे

**क.** 'पुरोगामी' कादंबरीतील शुद्धोधन

**ड.** 'नाकबळी' कथेतील विचारधारा

*****

मुंबई विद्यापीठ

दूर व मुक्त अध्ययन संस्था

0000000MAS119

# एम.ए. मराठी

## सत्र - I (CBCS)

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. - II

# उपयोजित समीक्षा - I

# (APPLIED CRITICISM)



## विषय कोड : 73454

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रवींद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवार**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **अनिल बनकर**
कला आणि मानव्य विद्याशाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **प्रा. मनिषा बनकर**
साहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **प्रा. डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे**
मराठी विभाग प्रमुख
श्री हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर,
ता. उदगीर, जि. लातूर

: **प्रा. डॉ. सीमा मुसळे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **प्रा. बालाजी कांबळे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर**
मराठी विभाग, कला वाणिज्य महाविद्यालय, मायणी,
ता. खटाव, जि. सातारा

मार्च २०२१, मुद्रण - १, जुलाई 2022 पुनः मुद्रण ISBN - 978-93-91735-63-0

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | सत्र - १ | |
| १) | समीक्षेचे स्वरूप व समीक्षेची उद्दिष्टे - प्रा. डॉ. सुशिलप्रकाश चिमोरे | ०१ |
| २) | रूपवादी समीक्षापद्धती - प्रा. डॉ. सीमा मुसळे | १८ |
| ३) | मानसशास्त्रीय समीक्षा - प्रा. बालाजी कांबळे | ३९ |
| ४) | उपयोजित समीक्षा - | |
| | रूपवादी समीक्षा पद्धतीनुसार - प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर | ५२ |
| | कथा - | |
| | १ - किडलेली माणसं | ६६ |
| | २ - कावळ्या-चिमणीची गोष्ट | ७३ |
| | कविता - | |
| | अ) दमयंती स्वयंवर | ७६ |
| | आ) रंगा येई वो ये | ७७ |
| | इ - तक्ता | ७८ |
| | ई - ऐक जरा ना | ७९ |


❖❖❖❖

# घटक-३

## मानसशास्त्रीय समीक्षा

**घटक रचना :**

३.० उद्देश
३.१ प्रस्तावना
३.२ मानसशास्त्रीय समीक्षा म्हणजे काय ?
३.३ मानसशास्त्रीय समीक्षेचे त्रिस्तरीय स्वरूप
३.३.१ इंद (Id)
३.३.२ अहं (Ego)
३.३.३ अतिअहं (Super Ego)
३.४ फ्राइडची मनोविश्लेषणात्मक संकल्पना
३.५ साहित्याचा फ्रॉइडने मनाशी जोडलेला संबंध
३.६ मानसशास्त्रीय समीक्षा पद्धतीचा उदय
३.७ मानसशास्त्रीय समीक्षेवर कार्ल युंगचा प्रभाव
३.८ मानसशास्त्रीय समीक्षेचा दृष्टिकोण
३.९ मानसशास्त्रीय समीक्षेच्या मर्यादा
३.१० समारोप
३.११ संदर्भग्रंथ
३.१२ प्रश्न

## ३.० उद्देश

१. विद्यार्थ्यांना मानसशास्त्र म्हणजे काय समजेल ?
२. साहित्यात मानसशास्त्रीय दृष्टीची ओळख होईल.
३. मराठी कांदबरीवरील मानसशास्त्राचा प्रभाव याची विद्यार्थ्यांना ओळख होईल.
४. मराठी कादंबरीचे मनोविश्लेषण करण्यास सोपे जाईल.
५. मानसशास्त्रीय समीक्षेमुळे मराठी साहित्याचे विस्तारित रूप समजून येईल.
६. मराठी साहित्य हे मानसशास्त्रीय दृष्टीने समजून घेता येईल.
७. मानसशास्त्रीय समीक्षेतून फ्रॉइडचा साहित्य सिद्धांत लक्षात येईल.

प्रकाशन क्रमांक : ९६०

Maharashtratil Bhakti Sampraday

महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय

संपादक : डॉ. पांडुरंग भोसले
डॉ. सचिन कपनर
प्रा. संग्राम गोसावी

प्रकाशन – समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर.

प्रकाशक – श्री. प्रविण अनिलराव भाकरे,
शंकर-पार्वती निवास, ढोले गल्ली, रांझणी,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर – ४१३ ३०४
मो. ९६८९९४१२०१ / ८६०५५१२७४२

© प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड
'हरिनामवेल', कृषी उत्पन्न बाजार समितीमागे,
मंचर, जि. पुणे – ४१० ५०३
मो. नं. ९७६७२२२७११

मुद्रण : एक्सेल प्रिंटींग प्रेस, पुणे

मुखपृष्ठ : संतोष घोंगडे

प्रथमावृत्ती : २८ मे, २०२२

अक्षरजुळणी : समीक्षा टाईपसेटर्स, पंढरपूर

ISBN : ९७८-९३-९४६२२-४७-०

किंमत : ३५०/- रु.

टीप : या पुस्तकातील लेखकांच्या लेखांमधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

समीक्षा पब्लिकेशनची सर्व पुस्तके bookganga.com या संकेतस्थळावर ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध आहेत.

# अनुक्रम

१. संत मेळ्याच्या अभंगातील वैचारिक जाणिवा
प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे / ११

२. संत तुकारामांच्या साहित्यातील समाजविचार
प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड / २१

३. स्त्री संतांची परंपरा : एक भगवी पताका
प्राचार्य डॉ. शिवाजी निवृत्ती मोहिते / २७

४. संत जनाबाईंचे अभंग : स्त्री जीवनाचा उत्कट काव्यमय अविष्कार
प्राचार्य डॉ. शोभा बाळासाहेब इंगवले / ३९

५. आनंद संप्रदाय आणि माणदेशी परंपरा
प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी / ४५

६. वारकरी संप्रदाय व आद्यकीर्तनकार संत नामदेव
प्राचार्य डॉ. भगवानसिंह राजपूत/ डॉ. सौ. मनिषा दयाघन पाटील / ५१

७. भक्ती संप्रदायाचे स्वरूप, विशेष व वाटचाल
डॉ. ज्योती परब / ५६

८. भक्ती संप्रदायांचे सामाजिक योगदान
डॉ. सीमा नाईक-गोसावी / ७०

९. महानुभावीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्म
डॉ. शीतल कोरडे / ७५

१०. महानुभावीय गद्य वाङ्मय
डॉ. अतुल नारायण चौरे / ८०

११. महानुभावांचे पद्यवाङ्मयाचा परिचय
डॉ. विक्रम जाधव / ८६

१२. महाराष्ट्रातील मुस्लिम (सूफी) संप्रदाय
डॉ. पांडुरंग भोसले / ९३

१३. नागेश संप्रदाय
डॉ. सचिन सि. रुपनर / १००

# ५. आनंद संप्रदाय आणि माणदेशी परंपरा

प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी
कला व वाणिज्य महाविद्यालय,
मायणी (सातारा)

महाराष्ट्र ही सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न असणारी ज्ञान भूमी आहे. इथे अनेक भक्ती संप्रदाय उदयास आले. तर अनेक साधू-संत-महंत यांच्या विचाराने, आचाराने आणि साधनेने सारा जनसमाज ढवळून निघाला. येथेच ज्ञान, भक्ती आणि पराक्रम यांचा सुकाळ निर्माण झाला. अनेक जाती उपजातीतील अवघा समाज भक्ती आंदोलनात एकवटला. गरीब-श्रीमंत, उच्च, नीच असा भेदभाव न ठेवता समतेच्या वाळवंटात प्रत्येक जीव वालुका कणासारखा अस्तित्ववान बनला. यातूनच नव्या महाराष्ट्राची जडणघडण झाली. प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालून रूढी, कर्मकांड आणि देवभोळेपणा निवृत्ती पलीकडे घालवून दिला. एक नूतन, नवा महान मराठी उदयास आला.

मध्ययुगीन कालखंडात नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, चैतन्य, समर्थ, आनंद असे अनेक भक्ती संप्रदाय उदयास आले. नाथ संप्रदाय हा सर्वात जुना संप्रदाय मानला गेला. मुळातच हे भारतीय विविध भक्तिसंप्रदाय सर्वसमावेशक आहेत. सामान्य व्यक्तीच्या जीवनातील सार बनून येतात तर कधी साधना होऊन जीवनशैलीचा एक भाग बनतात. त्यामुळे भारतीय संस्कृती वाङ्मयीनदृष्ट्या समृद्ध बनली आहे.

मध्ययुगात असलेली भक्ती परंपरा अनादी अनंत काळापासून चालत आली आहे. मात्र विविध मतप्रवाह कालौघात निर्माण झाल्यामुळे असंख्य भक्तिमार्ग उदयास आले. त्या संप्रदायातील शिकवण, परंपरा, आचारधर्म, ईशतत्त्वे भिन्न होती. काही संप्रदाय भौगोलिकतेनुसार, लोकस्थितीनुसार, कालानुसार, कर्मानुसार उदयास आले. कोणी पूजाअर्चा महत्त्वाची मानली, तर कोणी ग्रंथाला प्राधान्य दिले, तर कोणी पंथ निर्मात्यालाच देव संबोधले. याशिवाय भक्ती, साधना आणि परंपरा यास महत्त्व येऊन नव-नवे संप्रदाय हळूहळू महाराष्ट्रात उदयास येऊ लागले.

मध्ययुगात प्रामुख्याने द्वैती आणि अद्वैती असे दोन संप्रदाय होते. त्यात द्वैती मत असणारे महानुभव, जैन लिंगायत हे प्रमुख भक्तिसंप्रदाय होत. या संप्रदायांनी जीव, जगत आणि ईश्वर यांचे अस्तित्व भिन्न व वेगळे मांडले आहे, तर अद्वैती मतानुसार जीव, जगत आणि ईश्वर यांच्यात अभेद मानून भक्तीसाधना केली जात असे. यामध्ये नाथ, वारकरी, दत्त, चैतन्य, समर्थ, आनंद या संप्रदायाचा प्रामुख्याने समावेश होतो. असे असले तरीही

अद्वैती परंपरेतील संप्रदायाचे तत्त्वज्ञान असले तरी त्यांचे आराध्य दैवत, आचारधर्म, साधना मार्ग आणि परंपरा भिन्न आहेत. यातीलच आनंद संप्रदाय हा एक महत्त्वाचा अद्वैती तत्त्वज्ञानावर आधारलेला प्रमुख भक्तिसंप्रदाय असून त्यात प्रचंड ग्रंथनिर्मिती झाली आहे परंतु त्या संप्रदायावर योग्य त्या प्रमाणात संशोधन झालेले नाही.

आनंद संप्रदाय :

कोणताही भक्तिसंप्रदाय त्याच्या नावानुसार ओळखला जातो. कधी आचार धर्मानुसार, गुरूंच्या नावावरून, तर कधी अवतार वेशभूषेनुसार त्याच्यात नामकरण झालेले दिसते. मानवी जीवनात नेहमीच आनंदमय अनुभूती येत असते. दुःख असते पण तेही आनंदरूपीच असते. जीव म्हणजे ब्रह्म. ब्रह्म हेच आनंदरुपी असते. ब्रह्म प्राप्ती म्हणजेच आनंदप्राप्ती होय. मुळात साऱ्या विश्वात आनंद व्यापून उरला आहे. आपल्या जीवनशैलीतून प्रत्येकाला शेवटी आनंद मिळवायचा आहे, म्हणूनच हा संप्रदाय आनंद संप्रदाय होय.

कोणी यास 'अवधूत संप्रदाय' म्हणते. 'अव' म्हणजे खाली आणि 'धूत' म्हणजे मूळचाच स्वच्छ असणारा. दत्तात्रेयांना गुरू समजून, गुरुमंत्राचा उपदेश घेऊन, 'गुरु संप्रदाय' या नावाने या भक्तिमार्गाची ओळख आहे. गुरुमंत्राची साधना करून, गुरुशिवाय कोणीही मोठा नाही. म्हणून गुरुसेवा म्हणजेच 'गुरुमार्गी संप्रदाय' याही नावांनी हा भक्तिमार्ग ओळखला जातो. प्रपंचातून परमार्थ साधावा. त्यातून आपल्या आराध्य देवतेची भक्ती करावी अशी अपेक्षा असते. तो केवळ साधक नसतो तर तो परमार्थाकडे एका डोळ्याने पाहतो तर दुसऱ्या डोळ्याने असार प्रपंचाकडे कर्म म्हणून पाहतो.

गुरु-शिष्य म्हणजे आई-लेकरू असे नाते अनुभूतीतून अवतरते. या आनंदाची उपासना करण्यासाठी कोठेही फिरण्याची, तीर्थयात्रा करण्याची गरज नाही. गुरुमंत्रावर निष्ठा ठेवून जीवनातील दुःख लय पावते. शोक, भय नाहीसे होते आणि आनंदप्राप्ती घडते. मुळात जीव निर्लेप आहे. आपण तर सर्वत्र व्यापणारे ब्रह्म आहोत आणि ब्रह्म हेच आनंद स्वरूपी असते. त्याची प्राप्ती हा या संप्रदायाचा मूळ उद्देश आहे. बीज मंत्राचा जप, निरपेक्ष साधना करणे, मोहाचा त्याग करणे व स्वतःला आनंदमय रुपात पाहणे, अन् त्यात एकरूप होऊन जाणे हे या संप्रदायाचे ब्रीद आहे.

वेदाला प्रमाण मानणारा हा आनंद संप्रदाय भक्तीच्या नव्या रूपात पाहता येतो. अनुयायांना गुरुमंत्र देणे, त्यांना प्रबोधित करणे, साधुसंत यांची पुण्यतिथी, जयंती साजरी करणे, सत्संग घडविणे, गुरुपौर्णिमा, दत्तजयंती, गुरूंचे उत्सव या निमित्ताने दिंडी, नगरप्रदक्षिणा, कीर्तन, प्रवचन, आनंद मेळावा याचे आयोजन करणे. तसेच सप्ताहाचे नियोजन, अखंड वीणावादन, साधू-संतांचा सन्मान, ज्ञानसत्रे, महाप्रसाद इ. अनेक उपक्रम करून आनंदात तल्लीन होणे हा या संप्रदायाचा मुख्य उद्देश असतो.

मोक्ष', 'रामजन्म', 'शुकरंभासंवाद', 'पंचीकरण' इ. सुमारे १६ ग्रंथ व अनेक पदे त्यांनी लिहिली, राजयोगाबरोबर त्यांनी ज्ञानयोगही अनुभवला. रामदास, रंगनाथस्वामी, जयराम स्वामी वडगावकर, केशवस्वामी ब्रह्मनाळकर व आनंदमूर्ती या दास पंचायतनात समाविष्ट झाले.

रंगनाथस्वामींचे चुलतभाऊ आणि श्रीधरस्वामींचे वडील ब्रह्मानंद हे माणदेशात एक योगी, ज्ञानी पुरुष होऊन गेले. त्यांनी आपला पुत्र व शिष्य श्रीधरस्वामींसाठी इ.स. १६८२ मध्ये 'आत्मप्रकाश' हा ग्रंथ लिहिला,

**''नाझरे नाम नगरी । माणगंगेचि ये तिरि ।।**
**आनंद मठा अंतरि । समाधिस्थ दत्तात्रय ।।''**

आपल्या सुबोध आणि रसाळ आख्यानकवितेने मराठी माणसाच्या अंतःकरणाचा ठाव घेणारे माणदेशी सुपुत्र श्रीधरपंत नाझरेकर हे होत. ते व्यासंगी, बहुश्रुत आणि विद्वान होते. 'हरिविजय', 'पांडवप्रताप', 'रामविजय', 'वेदांतसूर्य', 'शिवलीलामृत', 'श्री पंढरीमहात्म्य,' 'मल्हारीविजय,' 'श्रीज्ञानेश्वरचरित्र' इ. अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले.

**''हा भीमातीर विहारी दिगंबर । आदिपुरुष परात्पर ।**
**आनंद संप्रदाय थोर । येथुनिया ।।''**

श्रीधरांची कविता साधी, सोपी, नीतिबोध शिकविणारी प्रासादिक, सुबोध आणि जनसामान्यांच्या कल्याणाची तळमळ असणारी आहे. आनंद संप्रदायातील हा कवी लोकविलक्षण असून लोकशिक्षणाचे काम करणारा एक महत्त्वाचा माणदेशी पंडित कवी आहे.

नाममहात्म्यातून सामान्य माणसाला रामाकडे जाण्याचा सोपा मार्ग दाखविणारे ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज हे अलिकडील काळातील सर्वश्रेष्ठ साधुपुरुष होत. भागवत धर्माची नदी आळंदीकडून देहूकडे उलटी वहात आली. हीच गोष्ट माणनदीच्या संबंधातही म्हणता येईल. माणनदीकाठी ज्ञानभक्तीचे मळे फुलले आहेत. 'नाझऱ्याच्या रंगनाथस्वामी व श्रीधरस्वामींनी माणदेशात ज्ञानाचा पाया घातला तर ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी त्यावर भक्तीचा कळस चढविला. माणनदी गोंदवल्याकडून नाझऱ्याकडे वहाते, पण ज्ञानभक्तीची, रामभक्तीची ही नदी नाझऱ्याकडून गोंदवल्यास उलटी वहात गेली आहे. तिचा विकास राजयोगाकडून भक्तीमार्गाकडे झाला आहे,' असे डॉ. कृष्णा इंगोले म्हणतात.

मंगळवेढे ही संतांचीच पावन भूमी आहे. दामाजीपंतांपासून कान्होपात्रा, चोखमेळा, लतिफबुवा, शिवदास महाराज, मौनीबुवा, बाळकृष्णबुवा असे अनेक संत भक्तिमार्गात आले. मध्वाचार्य संप्रदायाचे आचार्य जयतीर्थ टीकाचार्य मंगळवेढ्याच्या मातीत जन्मले होते.

आनंद संप्रदायातील नाझऱ्याचे संजीवस्वामी महाराज यांनी दत्तानंदांची वझरे येथील समाधी शोधून काढली. तेथे वृक्षलागवड व मंदिराचा जीर्णोद्धार केला. यांच्यापासून हा संप्रदाय हळूहळू बहुजनांच्या दिशेने वळू लागतो, बडोदा विद्यापीठाचे माजी कुलगुरू गुरुदेव रा. द. रानडे यांच्या गुरूभगिनी महासाध्वी संत शिवलिंगव्वा अक्का या इंचगिरी संप्रदायातील शिवभक्त होत्या. याशिवाय सांगोल्याचे राणोजीबुवा, विष्णु महाराज बिसुरकर, खर्डीचे संत सीताराम महाराज इ. अनेक माणदेशी संतांनी भक्तीमार्गातून बहुजन समाजाला योग्य दिशा दिली. सोरडीचे महाराजही याच परिसरात जन्मले.

**"माझे शेटफळे गाव हे निर्मळ । तेथे संतकुल नांदतसे ।**
**धन्य त्या गावीचे नरनारी जन । जाती उद्धरून राम म्हणे ।।"**

सुमारे शंभर वर्षापूर्वी गोविंदकाका महाराजांनी शेटफळे या माणदेशी गावात आध्यात्मिक व्यासपीठ उभे केले. पुढे वासुदेव महाराजांनी तेथे मठ स्थापना केला. अन् -आनंद संप्रदायाची परंपरा अखंड चालू ठेवली. या परंपरेत रत्नागिरीचे रामचंद्रअण्णा परांजपे आणि विदर्भातील पुसदचे नारायणदेव दाताळकर यांनी मठाधिपती म्हणून काम पाहिले. आज शकुंतला दाते या मठाधिपती आहेत. परंपरेतील संत-महात्म्यांचे पुण्यदिन, भागवत सप्ताह, दिंडी, ग्रंथवाचन, भजन, प्रवचन, कीर्तन, महाप्रसाद इ. अनेक उपक्रमातून आनंद संप्रदायपुढे चालत आहे.

याशिवाय तु. बु. मळ्यातीत दादा महाराज व गावातील महादूबुवा हे सत्पुरुष होऊन गेले.

हा आनंद संप्रदाय माणदेशात वारकरी परंपरेत मिसळल्यासारखा वाटतो. साधना, भक्ती करण्याची पद्धती, गुरुस्तवन परंपरा आणि विविध मठात होणारे धार्मिक कार्यक्रम भागवत भक्तीला अधिक जवळचे वाटतात. पंढरीचा श्रीविठ्ठल आणि त्या मठाचे मठाधिपती गुरू म्हणून अनुयायांच्या हृदयात वसलेले दिसतात. गुरुभक्तीतून प्रबोधन करणे, साधनेतून आनंद मिळविणे आणि त्याच आनंदात एकरूप होऊन जाणे, हे सतत घडताना दिसते. हा आनंद संप्रदाय माणदेशाबाहेरही मोठ्या प्रमाणात विस्तारलेला असून भक्तांची खूप मोठी संख्या पहावयास मिळते.

**संदर्भग्रंथ :**


१. गोसावी, र.रा., पाच भक्तिसंप्रदाय.
२. शेणोलीकर, ह. श्री., प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप .
३. नसिराबादकर, ल.रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास.
४. इंगोले, कृ.जो., माणदेश : स्वरूप आणि समस्या.
५. मोकाशी, स.आ. (संपा.), क्रांतिभूमी – ग्रामगाथा.


□□□